# प्रेसनोट दि. ०३/०५/२०१८

## मकोका गुन्हयातील दोन वर्षापासून फरारी आरोपीस पिस्टलसह विश्रामबाग पोलीसांनी केली अटक साडेतीन लाखांचा मुददेमाल जप्त

खडक पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ४०/२०१६ भादंविक ३९५, १२० (ब) तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(ii)-३(२)-३(४) या कायदयाखालील पाहिजे आरोपी बापू रामदास मळेकर वय ३७ वर्षे रा. सध्या मु. पो. लोहारवस्ती, वांगी, ता. करमाळा जि. सोलापूर मुळ गाव मु. पो. सोनगाव ता. बारामती जि. पुणे हा त्याचे नातेवाईकास भेटण्यासाठी वैकुंठ स्मशानभुमी चे रोडवर दि. ३०/०४/२०१८ रोजी १८.०० वा. हा त्याचेकडील मारूती सुझुकी स्विफ्ट कारमधून येणार आहे. अशी खबर विश्रामबाग पोलीस ठाणेचे पोलीस शिपाई सचिन जगदाळे व पोलीस हवालदार शरद वाकसे यांना मिळाली होती. त्याप्रमाणे विश्रामबाग पोलीस ठाणेचे पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील व त्यांचे तपासपथकातील कर्मचारी यांनी वैकुंठ स्मशानभुमी परीसरात सापळा रचून त्यास शिताफिने पकडले.

वरील आरोपी ज्या स्विफ्ट कार मधून आला होता त्या कारची झडती घेतली असता सदर कारमध्ये एक देशी बनावटीचे पिस्टल व दोन काडतुस व कार असा एकुण ३,२६,०००/- रू.चा माल हस्तगत केलेला आहे. त्याचेकडे केले तपासात खडक पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ४०/२०१६ भादंविक ३९५, १२० (ब) हा गुन्हा करून मिळालेल्या पैशातून त्याने सदरची स्विफ्ट कार विकत घेतली असल्याचे सांगीतले आहे. त्याचे विरूध्द एक देशी बनावटीचे पिस्टल व दोन काडतुस बेकायदेशीर हत्यार जवळ बाळगले असताना मिळून आल्याने त्यास अटक करून त्याचे विरूध्द विश्रामबाग पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर १०४/२०१८ आर्म ॲक्ट कलम ३, २५ व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे दि. ३०/०४/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद आरोपी हा बारामती पोलीस ठाणेकडील अभिलेखावरील गुन्हेगार असून त्याचे विरूध्द दरोडा, खंडणी, दुखापत, गर्दी मारामारी सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच खडक पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ४०/२०१६ भादंविक ३९५, १२० (ब) तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(ii)-३(२)-३(४) हा गुन्हा केल्यापासून तो अदयाप फरार होता.

वरील कामगिरी परिमंडळ १ चे पोलीस उप-आयुक्त बसवराज तेली, सहा. पोलीस आयुक्त शरद उगले यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत शिदे, पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील, पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे, धीरज पवार, सचिन जगदाळे, चेतन शिरोळकर, राहूल पवार, सुधीर भिलारे यांनी केली आहे.

गुन्हयाचा पुढिल तपास विश्रामबाग पोलीस ठाण्याकडिल पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील हे करीत आहेत.